जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
यांचे कार्यालय, नगर रोड, बीड ४३११२५
ई मेल bmkamble.rdcbeed@gmail.com, rdc.beed२@gmail.com
दुरध्वनी क्र. ०२४४२-२२२६०४ गृह विभाग-२ फॅक्स. २२२०११

क्र.२०१८/आरबी/डेस्क-२/वि.सा.स.अभि./नियुक्ती/कावी- ४१६ दिनांक. 10 JAN 2019

## जाहिर प्रगटन

बीड जिल्ह्यातील सर्व विधीज्ञ यांना या जाहीर प्रगटना द्वारे कळविण्यात येते की, बीड जिल्ह्यातील मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयातील कामकाज त्वरेने व सुरळीत होणे करिता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५ (३) नुसार तात्पुरत्या स्वरुपात नवीन पॅनल तयार करणे आवश्यक आहे. यासाठी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणुन विशिष्ट खटल्या करिता नेमणुक देणेसाठी पॅनल तयार करण्यात येणार आहे. सदर पॅनल गठीत करणे व पॅनलवरील (२०) अभियोक्त्यांची विशिष्ट प्रकरणांकरीता विशिष्ट न्यायालयात नेमनुक करण्याचे अधिकार जिल्हादंडाधिकारी, बीड यांचेकडे राहील.

२. अभियोक्ता प्रतिक्षा यादीवर ठेवावयाचे आहेत, विशिष्ट खटल्याचे काम चालवण्याचे आदेश संचालक व सरकारी अभियोक्ता सरकारी अभियोग संचालनालय, बीड हे पारित करतील. सदर विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे मानधन सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता सरकारी अभियोग संचालनालय, बीड यांच्या कार्यालयामार्फत अदा करण्यात येईल. सदर मानधन हे शासन निर्णयाप्रमाणे अनुज्ञेय राहील.

३. त्याअनुषंगाने विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदासाठी नव्याने नियुक्ती करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यातील अर्ज मागविले आहेत. यास अनुसरुन पात्र विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता (पॅनल) बनवून तात्पुरत्या स्वरुपात नवीन पॅनल तयार करणे आहे. पात्र विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता (पॅनल) बनवून तात्पुरत्या स्वरुपात नवीन पॅनल तयार करण्यासाठी खालील प्रमाणे पात्रता निकष निश्चित करण्यात आलेली आहे:-

१) अर्जदार भारताचा नागरीक असावा.
२) अर्जदार कोणत्याही विद्यापीठाचा विधि पदवीधर असावा.
३) त्यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे वकील म्हणून नोंदणी केलेली असावी.
४) अर्ज सादर करण्याकरिता अर्जदाराचे वय **दि.२१.०१.२०१९** रोजी ३८ वर्ष पेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांना वयाची अट ५ (पाच) वर्षापर्यंत शिथिलक्षम राहिल.
५) अर्जदारास फौजदारी प्रकरणे चालविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
६) उपरोक्त पदांवरील नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
७) अर्जदाराने अर्ज जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, जिल्हा बीड यांच्या नावाने अग्रेषित करुन **दि.२१.०१.२०१९ ते दि. २८.०१.२०१९** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन) सादर करावा.
८) विहीत करण्यात आलेल्या दिनांक व वेळेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अपूर्ण व अस्पष्ट अर्ज देखील स्विकारले जाणार नाहीत.
९) अर्जदाराने अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.
१०) उमेदवाराने नियुक्तीसाठी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब केल्यास त्यास अपात्र ठरविले जाईल.
११) उमेदवारांची निवड मुलाखत प्रक्रियेद्वारे केली जाईल. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
१२) प्रस्तावित नवीन नियुक्त्या ज्या दिनांकास अंमलात येतील त्या दिनांकापासून सद्यस्थितीत त्या त्या पदावर कार्यरत असलेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील त्यामुळे कार्यरत असलेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी प्रस्तावित नियुक्त्यांसाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
१३) अर्जाचा नमुना www.beednic.in या वेबसाईटवरुन प्राप्त करुन घ्यावा. त्यात नमुद केल्यानुसार कागदपत्रे जोडावीत.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी बीड

Scanned by CamScanner

## (Proforma of the Application for the appointment of Special Assistant Public Prosecutor)

Self Attested Photograph

1. Full Name of the Applicant :- ______________________
   (Starting with Surname)
   Father's/Husband's Name :- ______________________

2. Address for Communication :- ______________________
   ______________________
   ______________________

3.(a) Date of Birth :- [ | | | | | | | ]

(b) Age as on / /201 :- [ | | | | | ]
YY MM DD

4. Place of Birth :- ______________________

5. Whether Candidate is Domiciled in State of Maharashtra :- ______________________

(a) Whether enrolled as Member of the Bar Council of Maharashtra and Goa. (Specify the registation No. & date)

6. Educational Qualification :-
(Details of the examinations passed from S.S.C./H.S.C & onwards)

| Name of the examination | Name of University/ Board/ Institution | Subjects | Percentage | Year of Passing |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Scanned by CamScanner

(a) Practicing since year :-

| Name of the Courts where practised | Total no. of Criminal matters conducted | Total no. of other matters conducted |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

7. Previous employment, if any:-

| Post held | Date of joining | Date of leaving | Reasons for leaving |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

8. Languages known :-
(Read ..........................,..................................................,..................................)
(Write ..........................,..................................................,..................................)
(Speak ..........................,..................................................,..................................)

9. Whether the Applicant in involved in any criminal offence :- ____________________
(to specify the details of offence) ____________________
If so, wheather convicted/acquitted. ____________________

## DECLARATION

I, ______________________________, do hereby state that whatever is stated hereinabove is true and correct to the best of my knowledge and belief and if any information is found to be false and incorrect, my appointment as Law Officer, if made , shall stand automatically cancelled and I shall be liable for further necessary action.

Date:-

Place:- **Signature of the Applicant.**

**N.B.**

1. Candidate Shall append the required true copies of educational certificate, date of birth certificate, caste certificate, Bar council Certificate & experience certificate , duly attested.
2. The Applicant shall affix his recent passport size photograph with his signature.
3. Candidate is allowed to write any additional information about him self, if he desires.

Scanned by CamScanner